## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक २५ फेब्रवारी, २०१५

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए.०८१३/प्र.क्र.-१४१/राउशु २.—ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाचे विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ मध्ये सुधारणा करण्यास व ते तात्काळ अंमलात आणण्याचे ठरविले आहे व त्याअर्थी ते प्रसिद्ध न करता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप-कलम (३) च्या परंतुकानुसार पुर्वीच्या प्रकाशनाचा वापर न करता प्रसिद्ध करण्यात यावेत.

उक्त महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप कलम (२) च्या खंड (*b*) (*f*) आणि (*k*) द्वारे आणि इतर सर्व अधिकारांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तयार करीत आहे ते असे :—

१. या नियमांना विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती (सुधारणा) नियम, २०१५ असे संबोधण्यात यावे.

२. विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती (सुधारणा) नियम, १९५२ च्या नियम ५ मध्ये (यापुढे यास प्रधान नियम असे संदर्भावे) उप नियम (३) मध्ये,—

(*i*) खंड (*a*) मध्ये, उप-खंड (*i*) मध्ये, " कोणत्याही राष्ट्रीय अथवा राज्य महामार्ग " या शब्दांनतर " किंवा कोणताही राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा " या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

(*ii*) परंतुका मध्ये, विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती (सुधारणा) नियम, २००७ या शब्दांनंतर " विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती (सुधारणा) नियम, २०१५" या शब्दांचा समावेश करण्यात यावा. (*iii*) स्पष्टीकरणामध्ये,—

(*a*) परिच्छेद (*iii*) मध्ये,—

(१) किंवा " वाहनतळ " या शब्दांऐवजी किंवा " वाहनतळ किंवा " हे शब्द अंतर्भूत करण्यात यावे.

(२) खंड (*c*) मध्ये शब्दाच्या शेवटी " किंवा " या शब्दाचा समावेश करण्यात यावा.

(३) खंड (*c*) नंतर पुढील खंडाचा समावेश करण्यात याच्या तो असा—

(*d*) जर संरक्षक भिंत असल्यास पुतळ्याजवळील प्रवेशद्वाराचा मध्य बिंदू आणि जर संरक्षक भिंत नसल्यास पुतळ्याच्या चौथऱ्याचा मध्य बिंदू "

(४) परिच्छेद (*iii*) नंतर पुढील परिच्छेदाचा समावेश करण्यात यावा, तो असा—

(*iv*) " राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा " म्हणजे शासन मान्यताकृत असलेला कोणताही राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा जो या नियमासोबतच्या अधिसूचीमध्ये विषद करण्यात आलेला आहे. ".

**" अधिसूची**

**(नियम ५ पहावा)**

**राष्ट्रीय व्यक्तीमत्वाचे पुतळे**

१. महात्मा फुले

२. लोकमान्य टिळक

३. महात्मा गांधी

४. पंडीत जवाहरलाल नेहरु

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

६. विनोबा भावे

७. संत तुकडोजी महाराज

८. स्वातंत्र्यवीर सावरकर

९. स्वामी रामानंद तिर्थ

१०. इंदीरा गांधी

११. छत्रपती शिवाजी महाराज

१२. नेताजी सुभाषचंद्र बोस ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अं. शा. घार्गे,**
शासनाचे सह सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 25th February 2015.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA-0813/CR.141/EXC-2.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Special Permit and Licences Rules, 1952, should be brought into force at once, and therefore, the rule should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*f*) and (*k*) of sub-section (*2*) of section 143 of Maharashtra Prohibition Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Special Permit and Licences Rules, 1952 as follows :—

1. These rules may be called the Special Permit and Licences (Amendment) Rules, 2015.

2. In rule 5 of the Special Permit and Licences Rules, 1952 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*3*),—

(*i*) in clause (*a*) in sub-clause (*i*) after the words " any National or State Highway " the words " or any Statue of National Personality " shall be added ;

(*ii*) in the proviso, after the words, brackets and figures " the Special Permits and Licences (Amendment) Rules, 1990 " the words, brackets and figures, " and the Special Permits and Licences (Amendment) Rules, 2015 " shall be added ;

(*iii*) in the Explanation,—

(*a*) in para (*iii*),—

(*1*) in clause (*b*) for the words " or depot." the words "or depot, or" shall be substituted;

(*2*) in clause (*c*), at the end the word "or" shall be added;

(*3*) after clause (*c*), the following clause shall be added, namely :—

" (*d*) the mid-point of the nearest gate of the Statue, if there is a compound wall, and if there is no compound wall, the nearest point of foundation of such a Statue." ;

(*4*) after para (*iii*), the following para shall be added, namely :—

' (*iv*) "Statue of National Personality" means any Statue of the National Personality recognized by the Government specified in the Schedule appended to these rules.'.

3. In the principal Rules, after Form L, the following Schedule shall be added, namely :—

" *Schedule*

(*see* rule 5)

***National Personality***

1. Mahatma Phule,
2. Lokamanya Tilak,
3. Mahatma Gandhi,
4. Pandit Jawaharlal Nehru,
5. Dr. Babasaheb Ambedkar,
6. Acharya Vinoba Bhave,
7. Sant Tukadoji Maharaj,
8. Swatantraveer Savarkar,
9. Swami Ramanand Teerth,

10. Indira Gandhi,
11. Chhatrapati Shivaji Maharaj,
12. Netaji Subhashchandra Bose".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. GHARGE,
Joint Secretary to Government.